# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - मैफल
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. पल्लवी वि. पितळे

---

स्वरास्वरातील धुंदीत गुंगत
मनोमनातील मोहर फुलवीत,
सूर खुलविती आत्मानंद
नाद निनादती ब्रह्मानंद |

विणेमधले घनगंभीर सूर
मारव्यातूनी लावी हुरहुर,
वसंत आला फुलवीत गंध
बहार आणी मदन मनोहर |

बासरीतला सूर सुरम्य
अभोगीत तो राही दंग, गल्बलवी मग मालकंस
तराण्यात तर, औरच रंगत |

सतारीचे ते गुढ गुंजन खमाजात ते वाढविते लय,
चलत ठुमरीची, ठुमकत मूरकत
भैरवी आळवी, रम्य करुण स्वर |

Anahat Music Therapy